विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार राज्य सल्लागार समिती तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाची दि. ३०.०८.२०१३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.

दिनांक ३०.०८.२०१३ रोजी दुपारी ०३.०० वाजता मा.कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मधुकर गायकवाड | : | अध्यक्ष तथा कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| २. | श्री.शि.म.म्हात्रे | : | सह सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई. |
| ३. | श्री.कोदे | : | उप सचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई. |
| ४. | श्री.प्रकाश मा.देवतळे | : | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री.केदार काळे | : | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री.महेश मुद्दा | : | मालक प्रतिनिधी |
| ७. | श्री. राजेश फुले | : | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. दादाराव डोंगरे | : | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. मुन्वर शेख | : | कामगार प्रतिनिधी |
| १०. | श्रीम.निलांबरी भोसले | : | सहाय्यक कामगार आयुक्त तथा सचिव (प्रभारी ) |

सर्व प्रथम मा.अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

बैठकीच्या सुरुवातीस सर्व उपस्थित सदस्यांना मागील बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत देण्यात आली. त्यांचबरोबर राष्ट्रीयकृत बॅकेत गुंतवणूक केलेल्या सेसच्या रक्कमेचा तपशिल देण्यात आला. मागील इतिवृत्तास सर्व सदस्यांनी मान्यता दिली. तद्नंतर विषयसूचीनुसार बैठकीस सुरुवात करण्यात आली.

मा.अध्यक्षांनी यापूर्वी झालेल्या दि.०८.०७.२०१३ च्या बैठकीत आरोग्य व वैयक्तिक अपघात योजना नोंदीत पात्र लाभार्थी कामगारांना लागू करण्याबाबत निर्णय घेण्यासाठी एक उप समिती नेमली होती, याबाबतची माहिती सर्व उपस्थितांना दिली. मा.अध्यक्षांनी या बैठकीचा उद्देश हा याबाबत उपसमितीने जो निर्णय घेतला आह` तो सर्व सदस्यांसमोर ठेवून त्यास मंजूरी घेणे हा आहे. असल्याचे स्पष्ट केले. या समितीने वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन इन्शुरन्स ब्रोकर आस्थापनांच्या इरादा पत्रांचा तुलनात्मक अभ्यास करुन व या कंपनीच्या प्रतिनिधींशी प्रत्यक्ष चर्चा करुन लाईफ जनरल

इन्शुरन्स या कंपनीची ब्रोकर म्हणून निवड केली होती. तद्नंतर या उप समितीने ब्रोकर कंपनीच्या मदतीने जनरल इन्शुरन्स कंपनीकडून प्रस्ताव मागवून व त्यांच्या प्रतिनिधींशी प्रत्यक्ष चर्चा केली व न्यु इंडिया कंपनी या कंपनीची निवड केली आहे. विम्याचे हप्ते ठरविणे इत्यादी बाबी ब्रोकरच्या सल्ल्याने व विमा कंपनीच्या अधिका-यांशी चर्चा करुन या समितीने निश्चित केल्या आहेत. त्याप्रमाणे इमारत बांधकाम मंडळाकडे नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारांसाठी ज्यांचे सदस्यत्व जिवित आहे, अशा ८२३०० कामगारांच्या बाबत ही विमा योजना लागू करण्याबाबत ठरविण्यात आले. या योजने अंतर्गत स्वत: कामगार, आईवडील व दोन मुले अशा एकूण ६ जणांना (१+५) ही योजना लागू करण्याचे निश्चित केले. या ८२३०० कामगारांसाठी विम्याचे हप्ते व सेवाकर भरणा रु.३४ कोटी मंडळाने सदर विमा कंपनीकडे वर्ग केलेले आहेत. मा.अध्यक्षांनी सदर योजनेची थोडक्यात माहिती देताना सांगितले की, स्वत: लाभार्थी कामगार आणि कुटूंबातील पाच व्यक्तींना कुठल्याही आजाराकरिता या योजनेचा लाभ रु.२ लाखापर्यंत मदत मिळू शकतो; संपूर्ण देशात नऊशे हॉस्पिटल मध्ये लाभार्थी कामगारांना या सुविधा मिळू शकतात. रु. २ लाखापेक्षा जास्त खर्च होत असेल तर तो लाभार्थी कामगारास स्वत: करावा लागेल. या योजनेखाली रुग्णवाहीकेचा खर्च रु.१०००/- मर्यादेपर्यंत मिळू शकतो, सदर माहिती देवून मा.अध्यक्षांनी मंडळाने आरोग्य व वैयक्तिक अपघात योजना लागू केली आहे त्या कार्यवाहीस मान्यता द्यावी असे प्रतिपादन केले. त्यास सर्व उपस्थित सदस्यांनी ठरावाद्वारे मान्यता दिली.

मा.अध्यक्षांनी मंडळाची स्वत:ची या विषयाबाबतची योजना बंद करणे उचित होईल असे स्पष्ट केले. यावर श्री.डोंगरे यांनी ज्यांचा विमा उतरविला नाही त्यांना मंडळाची योजना लागू करावी असे मत व्यक्त केले.

यानंतर मा.अध्यक्षांनी मेडिक्लेम कार्ड वाटपाचा कार्यक्रम दि.०६.०९.२०१३ रोजी मा.उप मुख्यमंत्र यांच्या हस्ते, मा.कामगार मंत्री यांचे अध्यक्षतेखाली व मा.राज्यमंत्री (कामगार) यांच्या उपस्थितीत पुणे ये करण्याचे योजिले असून त्यास होणा-या अनुषंगिक खर्चास मंडळ सदस्यांनी मान्यता द्यावी अशी विनं केली असता, सर्व सदस्यांनी ठरावाद्वारे त्यास संमती दिली.

श्री.फुले यांनी अपघात झालेल्या कामगारांना जनश्री विमा योजना, आरोग्य व वैयक्तिक अपघा विमा योजना व कामगार नुकसान भरपाई कायद्याखाली फायदे मिळतात असे प्रतिपादन करुन कामा असताना मृत्यु झाल्यास कामगाराला रु.२ लाख देण्यात यावे असे प्रतिपादन केले. त्यांनी असेही सांगितले की. अपघाताचे प्रमाण अत्यल्प आहे. यावर मा.अध्यक्ष यांनी असे सांगितले की, नैसर्गिक मृत्यु सहा देण्यास विधी व न्याय विभागाचा आक्षेप असून, जर अपघाती मृत्यु असेल तर त्याला मंडळातर्फे फायदे द्द व नैसर्गिक मृत्युला देवू नयेत किंवा याबाबत विमा योजना राबवावी. श्री.देवताळे यांनी नैसर्गिक मृत्युबाबत

श्री.फुले यांनी केलेल्या मागणीस दुजोरा दिला. मा.अध्यक्ष यांनी याबाबत शासनस्तरावर विधी व न्याय विभागाशी चर्चा होवून नैसर्गिक मृत्यु ऐवजी अपघाती मृत्युबाबतचा फायदा द्यावा असा बदल करण्यात यावा असे विधी व न्याय विभागाचे मत असल्याचे सांगितले. श्री.फुले यांनी अपघाती मृत्युसाठी अनेक योजना आहेत पण नैसर्गिक मृत्युबाबत कामगारांना कुठलीच मदत मिळणार नाही याबाबत लक्ष वेधले. श्री.देवतळे यांनी याबाबत ब-याच वेळा चर्चा झाली आहे, याकडे लक्ष वेधले. मा.अध्यक्षांनी असे सांगितले की, विधी व न्याय विभागाने जे मत याबाबत दिले आहे ते सदस्यांपुढे ठेवले आहे. श्री.फुले यांनी प्रतिपादन केले की, मंडळ हे स्वायत्त असल्यामुळे याबाबत मंडळाने निर्णय घेणे आवश्यक आहे. मा.अध्यक्षांनी असे सांगितले की,मंडळाने केलेला ठराव शासनास मान्यतेसाठी ठेवावा लागतो. मा.अध्यक्ष यांनी अपघाती मृत्युबाबत जनश्री व आरोग्य व वैयक्तिक अपघात योजनेमध्ये व मंडळाच्या योजनेमध्ये सुध्दा अपघाती मृत्युबाबत फायदे दिले जातात. याकडे लक्ष वेधले असता,श्री.म्हात्रे यांनी एकाच वेळी हे सर्व फायदे एकाच व्यक्तीला देता येणार नाही असे मत मांडले. शेवटी शासनाने प्रसुत केलेल्या नियमावलीप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले.

मा.अध्यक्ष यांनी मोठी धरणे, कालवे येथे काम करणा-या बांधकाम कामगारांना संघटीत करुन त्यांची नोंदणी करण्यात यावी असे मत मांडले, त्यामुळे कामगारांना या योजनेचे सर्व लाभ मिळू शकतील. याबाबत अशी कामे करणा-या विभागास जलसंपदा सचिवांच्या सहीने एक पत्र पाठवावे असे उप सचिव, जलसंपदा यांना सांगण्यात आले. श्री.देवतळे यांनी पाटबंधारे विभागातील कंत्राटदाराची नोंदणी करणे आवश्यक असल्याचे सांगितले, अशा कंत्राटदारांची नोंदणी झाल्यावर त्याची एक प्रत इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाला देण्यात यावी असे श्री.फुले यांनी सुचविले. श्री.काळे यांनी नगरपालिका यांना कंत्राटदार नोंदीत असला पाहिजे, अशी अट घालावी असे सुचविले. त्यांनी असेही प्रतिपादन केले की,नगरपालिकांना उपकर वसुलीबाबत कळवावे.

मा.अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, जर एखाद्या कंत्राटदाराने सेस टॅक्स चुकून जास्त भरला तर तो परत करण्याचे अधिकार मंडळाला आहेत. यावर मालक प्रतिनिधी श्री.मुद्दा यांनी असे विचारले केले की एखाद्या कामाचा सेस भरला नाही, तर तो पुढील कामाच्या वेळी डबल भरु शकतो का, याबाबत मा.अध्यक्षांनी मागील कामाचा सेस त्याचवेळी भरावा लागतो असे सांगितले. मा.अध्यक्षांनी मे.बालाजी (बेलाल) (इन्फ्रा कॉन्स) यांनी चुकून नागपूर महानगरपालिकेत भरावयाची कराची रक्कम रु.१४ लाख इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाकडे चुकून भरली आहे, असे सांगितले. या बांधकाम व्यवसायिकाने मंडळाचा उपकर सुध्दा भरलेला आहे, हे स्पष्ट करुन या कंत्राटदाराने अशी विनंती केली आहे की,

महानगरपालिका,नागपूरकडे भरावयाची कराची रक्कम चुकून या मंडळाकडे भरली असल्यामुळे ती त्यांना परत करावी. याबाबत सर्व सदस्यांनी रक्कम परत करण्याबद्दल ठरावाद्वारे अनुमती दिली.

मा.अध्यक्ष यांनी मुख्य सचिवांकडे झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत कामगार येत असतील तर त्यांच्यासाठी Transit कॅम्प बांधता येतील का, अशी विचारणा केली असल्याचे सांगितले. तसेच मालकांच्या साठी काही योजना आहेत का, अशी विचारणा केली असल्याचे सांगितले. श्री.मुद्दा यांनी मालक सेस भरतात त्यांच्यासाठी काही करता येईल का, असे विचारले असता, श्री.डोंगरे यांनी मालकांना कामगारांच्या कल्याण योजनांसाठी मंडळातर्फे आर्थिक सहाय्य देता येईल असे सांगितले.

श्री.डोंगरे व इतर सदस्यांनी स्थलांतरीत कामगारांच्या नोंदणी संदर्भात महाराष्ट्रातील कामगारांचा विचार होत नाही, नाका कामगारांची नोंदणी होत नाही, ९० दिवसांचा प्रस्ताव पडून आहे असे सांगितले. याबाबत मा.अध्यक्षांनी ९० दिवसांच्या अटीबाबत व मंडळाच्या खर्चाच्या ५% अटीबाबत केंद्र शासनाचा विचार सुरु असल्याचे प्रतिपादन केले. मा.अध्यक्षांनी केंद्र शासनाकडून कामगारांच्या प्रशिक्षणासाठी नविन आय.टी.आय.काढावे असे पत्र आले असल्याचे प्रतिपादन केले. यावर श्री.डोंगरे यांनी ॲकडमी सुरु होईपर्यत शासकीय मान्यताप्राप्त असलेल्या संस्थेमध्ये अशा पात्र कामगारांना प्रशिक्षणासाठी प्रवेश द्यावा असे सुचविले.

श्री. फुले, कामगार प्रतिनिधी यांनी कंत्राटदाराकडे जर १०० लोक काम करीत असतील तर फक्त २०-२२ कामगारांची नोंदणीसाठी मालकाकडून प्रमाणपत्र दिले जाते त्यामुळे इतर कामगारांना नोंदणीच्या प्रक्रियेतून वगळण्यात येते, कारण ९० दिवसाचे प्रमाणपत्र दिले तर त्यांना पी.एफ.,इ.एस.आय. इत्यादी फायदे मालकाला दयावे लागतात, या बाबीकडे लक्ष्य वेधले. याबाबत मा.अध्यक्षांनी अवेअरनेस कॅम्प घेणेबाबत परिपत्रक तयार करुन जिल्हानिहाय दौरे आखून त्यात मंडळ सदस्यांना सहभागी करुन घेण्यास सांगितले, व अवेअरनेस कॅम्पबाबत वेळापत्रक बनवून तसे पत्र काढण्याच्या सुचना बांधकाम कामगार मंडळाचे सचिव यांना दिल्या.

श्री. डोंगरे यांनी बांधकाम कामगाराला मंडळाकडे नोंदणी करण्याकरीता श्रमिक संघटनांना ९ दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकाराबाबत निर्णय घ्यावा असे सांगितले. मा.अध्यक्षांनी विधी न्याय विभागाने यास मान्यता दिली नसल्याचे सांगितले. यावर श्री.डोंगरे यांनी कामगार विभागाने याबाबती निर्णय घ्यावा असे सांगितले. त्यांनी संघटनांना असे अधिकार द्यावेत असे प्रतिपादन करुन बांधकाम कामगारांना फायदे देते वेळी तपासणी करुन फायदे देता येतील असे सांगितले. घरेलू कामगारांसा सेल्फ डिक्लरेशन (Self Declaration ) आहे त्या धर्तीवर बांधकाम कामगारांचे सेल्फ डिक्लरेशन (S Declaration) घेवून नोंदणी करावी असेहि श्री.डोंगरे यांनी सांगितले.मा.अध्यक्ष यांनी ९० दिवसाच्या

प्रमाणपत्रासाठीची बाब केंद्र शासनाच्या विचाराधीन असल्याचे सांगितले. श्री.डोंगरे यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला. 'बांधकाम कामगारांना ९० दिवसांचे प्रमाणपत्र नोंदणीकृत संघटनांनी द्यावीत व सरकारी कामगार अधिकारी यांनी योजनांचे फायदे बांधकाम कामगारांना मिळण्यासाठी संपूर्ण तपासणी करावी.' यावर मा.अध्यक्षांनी बांधकाम कामगारांस ९० दिवसाचे प्रमाणपत्र नोंदणीसाठी संघटनांना अधिकार दिला तरी त्याची तपासणी करुन सरकारी कामगार अधिकारी जे नोंदणी अधिकारी आहेत त्यांना कायद्याप्रमाणे अंमलबजावणी करावी लागेल, ही बाब सदस्यांच्या नजरेस आणून दिली. श्री.फुले यांनी योजनांचे फायदे मंजूर करण्याचे अधिकार जिल्हानिहाय देण्यात यावेत, अशी सूचना केली. त्यावर मा.अध्यक्षांनी असे सांगितले की, त्यापेक्षा छाननी सुटसुटीत करावी. श्री.फुले यांनी पदविका अभ्यासक्रमासाठी द्यावयाच्या सहाय्यतेची रक्कम रु.२०,०००/- प्रतीवर्षी देण्याची मागणी केली त्यास सर्व सदस्यांनी ठरावाद्वारे मान्यता दिली.

श्री. डोंगरे, कामगार प्रतिनिधी यांनी मा.अध्यक्षांना असे सुचविले केले की, योजनेची यादी देता, त्यामध्ये रक्कम दाखवित नाही ती दाखविण्यात यावी. श्री. फुले,कामगार प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, ज्या बांधकाम कामगारांची मुले शासनमान्य संस्थेमध्ये भारतीय प्रशासकीय सेवा व इतर भारतीय सेवा पूर्व परिक्षा अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेतील, त्याचा संपूर्ण खर्च मंडळाने करावा, त्यास सर्व सदस्यांनी ठरावाद्वारे मान्यता दिली.

श्री.काळे यांनी असे सुचविले की, केंद्र सरकार तर्फे स्वावलंबन योजना, (एल.आय.सी.) राबविण्यात येतात, त्याच धर्तीवर बांधकाम कामगारांसाठी स्वावलंबन योजना, पेन्शन योजना राबविण्यात यावी. त्यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की, हा मुद्दा पुढच्या बैठकीत मांडण्यात येईल.

श्री. काळे, मालक प्रतिनिधी यांनी मनरेगा कामावर एका कुटुंबातील ४/५ जण मिळून १०० दिवर काम करतात त्यामुळे त्यांची नोंदणी होत नाही असे सांगितले. श्री. डोंगरे, कामगार प्रतिनिधी यांनी अ संगितले की, एखादा नोंदित कामगार जर उपचारासाठी दवाखान्यात भरती झाला तर त्याच्या कुटुंबा उदरनिर्वाह भत्ता देण्यात यावा. सदरचा विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे ठरले.

जर एखादा कामगार कामावर असताना अपघाती मरण पावला तर त्याला मंडळाचे फाय मिळणेबाबत श्री. डोंगरे यांनी असे सांगितले की. जर कामागार मंडळामध्ये नोंदित नसेल आणि त्याचा पोस्टमार्टम रिपोर्ट व व पॉलिस रिपोर्ट यांच्या कागदपत्राची तपासणी करुन सदर कामगाराला मंडळ फायदे देण्यात यावेत. यावर श्री.काळे, मालक प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, सदर काम कंत्राटदाराकडे काम करीत असेल तर कंत्राटदाराकडून पैसे वसूल करुन देण्याची जबाबदारी मालक राहील.

श्री.डोंगरे,श्री.देवतळे यांनी मोबाईल पाळणाघर सुरु करणेबाबत मागणी केली. त्यावर मा.अध्यक्षांनी प्रायोगिक तत्वावर एन.जी.ओ.मार्फत एका वाहनामध्ये सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन फिरते पाळणाघर सुरु करण्याबाबत सुचविले. श्री.मुद्दा यांनी अशा काही संस्था आहेत त्या अशा प्रकारचे पाळणाघर चालवित असून त्याबाबतची माहिती देण्याचे मान्य केले.

श्री. डोंगरे कामगार प्रतिनिधी यांनी इमारत बांधकाम मंडळाकडे जमा झालेला निधी मुदतठेवी मध्ये ठेवताना धोरण निश्चित करुन त्यासाठी एक वित्तीय गुंतवणूक कमिटी नेमण्यात यावी असे सूचविले.श्री फुले, कामगार प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, करोडो रुपये बँकेमध्ये ठेवले आहेत, त्याचा तपशिल कृपया सर्व सदस्यांना देण्यात यावा. यावर मा.अध्यक्षांनी गुंतवणूकीचा तपशिल सर्व सदस्यांना देण्याच्य सूचना दिल्या. सर्व सदस्यांना गुंतवणूकीच्या तपशिलाचे वाटप करण्यात आले. मा. अध्यक्षांनी पुढे अर प्रतिपादन केले की, सर्व रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकांमध्ये फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवण्यात आलेली आहे यावर श्री. फुले, कामगार प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, प्रत्येक बँकेचे व्याजदर हे वेगवेगळे आहेत त्यामुळे मंडळाचा तोटा होतो. यावर श्री. म्हात्रे, उप सचिव यांनी महाराष्ट्रातील सर्व राष्ट्रीयकृत बँके व्याजदर मागवून घेवून त्यानंतर ज्या राष्ट्रीयकृत बँकेचे दर जास्त आहेत त्या बँकेत सदर रक्कम ठेवण्या यावी, याबाबतीत वित्त विभागाकडे शासन निर्णय आहे, त्याप्रमाणे गुंतवणूक करण्यात यावी, असे सांगित श्री.डोंगरे, श्री.देवतळे यांनी गुंतवणुक करण्यापूर्वी उप समितीची मान्यता घेवून गुंतवणूक करावी अ सांगितले. सर्व सदस्यांनी मा.अध्यक्षांना असे सांगितले की, बैठकीची सूचना आम्हाला ई-मेलव्दारे देण्य यावी, यास मा.अध्यक्षांनी सहमती दर्शविली. श्री.डोंगरे, कामगार प्रतिनिधी यांनी असे प्रतिपादन केले व कौशल्यवृध्दीसाठी एक समिती गठीत करावी. त्यांनी पुढे असेही सांगितले की, कौशल्यवृध्दीची योज ॲकडमी उपलब्ध होईपर्यत श्रमिक संघटना, सामाजिक संस्था (NGO) व्दारे राबविण्याकरिता संस्थे निवड करण्यासाठी जाहीरात द्यावी.

श्री.डोंगरे, कामगार प्रतिनिधी यांनी श्री.सोमनाथ पोटरे, माजी कक्ष अधिकारी यांच्या नाव मंडळाच्या सचिव पदासाठी शिफारस केली. श्री.काळे यांनी मंडळासाठी बांद्रा-कुर्ला संकुलामध्ये ज उपलब्ध असल्यासंबंधी माहिती दिली. यावर श्री.म्हात्रे,उपसचिव यांनी या बाबत चौकशी करण्यात ये असे सांगितले. श्री.डोंगरे यांनी सदरच्या मंडळाचा कार्यकाळ संपल्यानंतर नवीन मंडळाची नेमा होईपर्यत, हे मंडळ कार्यरत रहावे असे सुचविले. यावर मा.अध्यक्षांनी उपलब्ध तरतुदीनुसार शासनस्तर कार्यवाही होईल, या मंडळाचा संबंध नाही.

सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे मा.अध्यक्ष यांनी घोषित केले.

B.o.c.m.३०.८.१३ स - ३

अध्यक्ष

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम